


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २१९, मंगळवार १४ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# हाय होल्टेज लढतीत हाय होल्टेज ड्रामा!

■ भाजपा तालुकाध्यक्षांना पैसे वाटताना पकडले ■ भाजपा, राष्ट्रवादी कार्यकर्त्यांकडून एकमेकांना मारहाण
■ पारनेर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे ■ मतदानाच्या पुर्वसंध्येला पारनेर तालुक्यात तणाव

पारनेर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीतील विद्यामान खासदार डॉ. सुजय विखे व आमदार नीलेश लंके यांच्या हाय होल्टेज लढतीमध्ये मतदानाच्या पुर्वसंध्येला रविवारी रात्री हाय होल्टेज ड्रामा पहावयास मिळाला. भाजपा तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी पैसे वाटताना रंगेहात पकडले त्यानंतर दोन्ही गटांकडून एकमेकांना मारहाणही करण्यात आली. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.**

याप्रकरणी नीलेश लंके समर्थक अनिल गंधाक्ते यांच्या फिर्यादीवरून भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे तसेच भाजपा कार्यकर्ते सचिन मच्छिंद्र वराळ व विजय सदाशिव औटी यांच्यासह २० ते २२ जणांविरोधात फिर्याद दाखल केली आहे. शिंदे हे पैसे वाटताना पकडल्यानंतर आपणास मारहाण करण्यात आली तसेच त्यांच्या चुलतीच्या गळयातील चार तोळे वजनाचे मंगळसुत्र ओरबडून नेल्याचे, तसेच चुलतीस मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे.

भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल प्रकाशराव शिंदे रा. रांजणगांव मशिद, ता. पारनेर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमुद करण्यात आले आहे की, दि. १२ मे रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास शिंदे क्रेटा कार क्र. एम एच १२ व्ही क्यु ४११४ चालक शरद अंबादास सोमवंशी यांच्यासोबत अळकुटी येथे निघाले असता आरोपी अनिल गंधाक्ते यांनी कारचा पाठलाग करून कारपुढे दुचाकी लावून उभी केली. गंधाक्ते यांनी शिंदे यांच्या कारची मागील काच फोडून त्यांना शिविगाळ केली. आरोपी गंधाक्ते व त्यांच्यासोबतच्या चार ते पाच जणांसह गंधाक्ते यांनी रिव्हॉल्व्हरने शिंदे यांना धमकावत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्याच वेळी गंधाक्ते यांच्यासोबतच्या आरोपीने शिंदे यांच्या गळयातील तीन तोळयांची दिड लाख रूपये किमतीची सोन्याची चेन काढून घेतली. आरोपींनी शिंदे यांच्या गाडीच्या डिकीतील कागदपत्रे रस्त्यावर टाकून पैसे वाटप करीत असल्याचा आरोप केला. शिंदे यांच्या फिर्यादीवरून अनिल गंधाक्ते व इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, या माहरणीसंदर्भात अनिल दत्तात्रेय गंधाक्ते रा. वडझिरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रविवार दि. १२ मे रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गंधाक्ते व त्यांचे मित्र प्रकाश शिवाजी मोरे रा. वडझिरे हे उभे असताना निघोज गावाकडून पांढ-या रंगाची क्रेटा कार क्र. एम एच १२ व्ही क्यु ४११४ मधून भाजपा तालुकाध्यक्ष राहुल प्रकाश शिंदे हे तिथे आले.



कारची काच खाली करून तिथे दुचाकीवर उभ्या असलेल्या अनोळखी इसमाकडे शिंदे यांनी पैशांचे बंडल दिले.

गंधाक्ते यांना संशय आल्याने अळकुटीच्या दिशेने जात असेलल्या शिंदे यांच्या कारचा त्यांनी ॲक्टीव्हा दुचाकीवरून पाठलाग सुरू केला. देवीभोयरे फाटयापासून पुढे असलेल्या एका पेट्रोल पंपावर शिंदे यांची कार जाऊन उभी राहिली. तिथे लाल रंगाच्या पॅशन मोटारसायकलवर दोन अनोळखी इसम उभे होते. राहुल शिंदे यांनी कारमधून उतरून कारच्या डिकीमधून प्लॅस्टिक कागदात गुंडाळलेले पैशांचे दोन मोठे बंडल काढून मोटारसायकलवर आलेल्या इसमांच्या ताब्यात दिले. शिंदे हे दोन इसमांना पैसे देत असताना वडझिरे येथील काही नागरीकांनी त्या प्रसंगाचे चित्रीकरण करण्यास सुरूवात केली. त्यावेळी गंधाक्ते हे राहुल शिंदे यांच्याजवळ गेले असता शिंदे यांनी पैशाने भरलेली काळया रंगाची पिशवी अनिल गंधाक्ते यांच्या अंगावर फेकली. त्या पिशवीतूनही ५०० रूपयांच्या नोटांचे बंडल रस्त्यावर पडले. त्याचेही चित्रीकरण तिथे उपस्थित असलेल्या नागरकांनी केले.

पैसे वितरण करताना रंगेहात पकडल्यानंतर हे प्रकरण इथेच मिटवून घे, नाहीतर तुला जड जाईल अशी दमबाजी करीत राहुल शिंदे यांनी हे पैसे तुला ठेव व तुला आजून किती पैसे पाहिजेत ते सांग. हा विषय इथल्या इथेच संपून जाईल असे ते म्हणाले. गंधाक्ते त्यास न धजावल्याने शिंदे यांनी गंधाक्ते याच्या मानेस धरून त्यास मारहाण केली.

शिंदे यांनी फेकलेले पैसे रस्त्यावर पडलेले असतानाच पंधरा ते वीस मिनिटात भाजपाचे कार्यकर्ता सचिन मच्छिंद्र वराळ रा. निघोज हा १५ ते २० इसम घेऊन तिथे पोहचले. त्या इसमांमधील विजय सदाशिव औटी रा. पारनेर यांच्या हातामध्ये लोखंडी रॉड तर इतर इसमांच्या हातामध्ये लोखंडी पाईप होते.
सचिन वराळ हे घेउन आलेल्या जमावामधील इसमांनी तिथे उपस्थित असलेल्या वडझिरे गावातील नागरीक तसेच कार्यकर्त्यांवर हल्ला चढविला. अनिल गंधाक्ते यांना तुला उद्याचा सुर्य पाहू देणार नाही, तुला संपवून टाकू अशी धमकी देत मारहाण करण्यास सुरूवात केली. या मारहाणीत गंधाक्ते यांच्या उजव्या हाताच्या दंडावर, छातीवर तसेच मानेवर मार लागला. मारहाणीमध्ये गंधाक्ते यांच्या अंगावरील शर्टही फाटला.

जमावाकडून गंधाक्ते यांना मारहाण सुरू असताना त्यांची चुलती वर्षा पांडूरंग गंधाक्ते या मारहाणीतून वाचविण्यासाठी घटनास्थळी आल्या असता राहुल शिंदे व इतर इसमांनी त्यांनाही मारहाण करण्यास सुरूवात केली. वर्षा यांना मारहाण सुरू असताना जमावातील कोणीतरी त्यांच्या गळयातील चार तोळे वजनाचे २ लाख रूपये किमतीचे मंगळसुत्रही ओरबडून घेतले. त्यानंतर हा जमाव घटनास्थळावरून वाहनांमध्ये बसून पसार झाला.

अनिल गंधाक्ते यांच्या फिर्यादीवरून भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल प्रकाशराव शिंदे, रा.रांजणगांव मशिद, ता. पारनेर, भाजपा कार्यकर्ता सचिन मच्छिंद्र वराळ रा. निघोज, ता. पारनेर व विजय सदाशिव औटी रा. पारनेर यांच्यासह २० ते २२ जणांविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तालुक्यात तणाव

**शिंदे व गंधाक्ते यांच्यात पैसे वाटपावरून वाद झाल्यानंतर तालुक्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यातील सर्व विखे समर्थकांनी पारनेर पोलीस ठाण्याकडे धाव घेतल्याने परिसरास जत्रेचे स्वरूप आले होते. दुसरीकडे लंके समर्थकांनी मात्र आपले गाव न सोडता लंके यांच्या सुचनेनुसार गावात थांबणे पसंत केले.**

## पोलीसांचा लाठीमार

**पारनेर पोलीस ठाण्याच्या आवारात विखे समर्थकांचा मोठा जमाव झाल्याने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीसांनी जमावावर सैम्य लाठीमार करीत जमाव पांगविला. जमावानंतर पोलीस व कार्यकर्त्यामध्ये बाचाबाचीही झाली.**

## वनकुटयात विकास रोहोकले यांना घेरले !

**एकीकडे वडझिरे व पारनेर येथे हायहोल्टेज ड्रामा सुरू असताना वनकुटे येथे रात्री शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे तालुकाप्रमुख विकास रोहोकले यांना आदिवासी वस्त्यांमध्ये संशयास्पदरीत्या फिरताना लंके समर्थकांनी पकडले. यावेळी रोहोकले यांना धक्काबुक्कीही झाली. गावातून निघून जाण्याची भूमिका रोहोकले यांनी घेतल्यानंतर लंके समर्थकांनी समजुतदारपणाची भूमिका घेतली.**

## उपविभागीय अधिकारी भोसले यांचा बडेजाव !

**वडझिरे येथे विखे-लंके समर्थकांमध्ये वाद झाल्यानंतर पारनेर पोलीस ठाण्यात दोन्ही गटांचे प्रमुख कार्यकर्ते आल्यानंतर एकमेकांमध्ये बाचाबाची सुरू असताना उपविभागिय पोलीस अधिकारी संपतराव भोसले यांनी दोन्ही गटात सामंजस्य निर्माण करण्याऐवजी आरेरावीची भाषा वापरली. आतापर्यंत ३५ बदल्या झाल्या आहेत. ३६ वी झाली तरी मला त्याची फिकीर नाही असे सांगत ते स्वतःचाच बडेजाव मिरवत होते. त्यांच्या रोषातून वकील, पत्रकारही सुटले नाहीत !**

# मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश!

### उमेदवार नीलेश लंके यांनीच केली पोलखोल

नगर : प्रतिनिधी

**मुस्लिम तसेच मागासवर्गीय मतदारांना मतदानापासून वंचित ठेवणाऱ्या रॅकेटचा महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी सोमवारी पर्दाफाश केला.**

दोन्ही समाजातील मतदारांना एका खोलीमध्ये नेण्यात येऊन त्यांच्या बोटाला शाई लावण्यात येत होती. त्या बदल्यात प्रत्येक मतामागे ५०० रूपये देण्याचे कबुल करण्यात आले होते. प्रत्यक्षात बोटाला शाई लावल्यानंतर मात्र ५०० रूपये मिळाले नसल्याचेही या मतदारांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार सुमारे ३०० जनांचे हे रॅकेट नगर शहरात कार्यरत असल्याची धक्कादायक माहीती हाती आली आहे. या रॅकेटची उमेदवार नीलेश लंके यांना माहीती मिळाल्यानंतर त्यांनी या रॅकेटमधील काही इसमांना ताब्यात घेतले असून त्यांची त्याची कबुली दिली आहे. हे रॅकेट जेथून चालविण्यात



येत होते. त्या खोलीमध्ये शाईची बाटलीही आढळून आली आहे. शाई लावताना संबंधित व्यक्तीचे आधारकार्ड, मतदान कार्ड तपासले जात होते.

लंके यांनी काही इसमांना ताब्यात घेत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. लंके यांनी ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव श्रीपाद जाधव

असल्याची माहीती असून तो नगर उत्तर नगर जिल्हयातील प्रवरानगरचा आहे. ठेकेदारीचे काम करणाऱ्या या जाधवकडे चौकशी केल्यानंतर अधिक तपशील उपलब्ध होणार आहे.

## निवडणूक कर्मचाऱ्यांकडे विखेंची प्रचारपत्रके

**पाथर्डी तालुक्यातील घुमटवाडी येथील मतदान केंद्रावरील निवडणूक कर्मचाऱ्यांकडे भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांची प्रचार पत्रके आढळून आली. ही बाब महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मतदानकेंद्रावरील मतदान थांबवून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार केली.**


# अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा

नगर : प्रतिनिधी

**नगर दक्षिण मतदारसंघात अंदाजे ६० टक्के मतदारांनी हक्क बजावला. सोमवारी उशिरा सर्व मतदान केंद्रांवरील आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर निश्चित आकडा समोर येईल.**

सोमवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत शेवगांव ५४.१८, राहुरी , ५६.८४ पारनेर ४६.६०,नगर शहर ५४.५०, श्रीगोंदे ५१.२४ कर्जत जामखेड ५७.२० टक्के मतदान झाले होते.
पारनेर तालुक्यात ५ वाजेपर्यंत सर्वात कमी मतदान झाल्याचे दिसत असले तरी अंतिम आकडेवारी ६० टक्क्यांहून अधिक असेल असा

उर्वरीत पान ३ वर





## भाळवणीत नऊ वाजेपर्यंत मतदान

**भाळवणी येथील ९२ क्रमांकाच्या मतदान केंद्रावर १ हजार ४७८ एवढी मतदार संख्या होती.दुपारपर्यंत संथगतीने सुरू असलेल्या मतदानाला पाच वाजेनंतर वेग आला. मतदान संपायच्या वेळेपर्यंत सुमारे ३०० मतदार मतदान केंद्रात रांगा लावून होते. या मतदान केंद्रातील प्रक्रिया ही संथ गतीने सुरू असल्याने सुमारे नऊ वाजेपर्यंत मतदान सुरूच होते.**

# अण्णा हजारे यांनी मतदानाचा हक्क बजावला

### चारित्र्यशील आणि निष्कलंक उमेदवाराला मतदानाचे आवाहन

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सोमवारी राळेगणसिध्दीतील जिल्हा परिषदेच्या शाळेत मतदानाचा हक्क बजावला. हजारे यांनी मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले.**

हजारे म्हणाले, मतदारांनी लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊ चारित्र्यशील आणि निष्कलंक



उमेदवारास मतदान करावे. पैसे घेऊन मतदान करणे हे देशाचे दुर्दे व आहे असे नमुद करून देशासाठी शहीद झालेल्या शहीदांचाहा अपमान असल्याचे मत हजारे यांनी नोंदविले. मतदारांच्या हाती देशाची चावी असल्याने ही चावी योग्य पध्दतीने योग्य कुलपाला लावत योग्य उमेदवाराची निवड करण्याचे आवाहन अण्णांनी केले.

# १०२ वर्षांच्या आजीबाईचे मतदान ! चार पिढ्यांच्या मतदारांची उपस्थिती



भोंद्रे : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीसाठी सोमवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत भोंद्रे येथील १०२ वर्षांच्या श्रीमती वणाबाई आनंदा झावरे या आजीबाईनी मतदान केंद्रावर जात आपला मतदानाचा हक्क बजावला. आजीबाईच्या मतदानावेळी चार पिढयांचे मतदान उपस्थित होते.**

१०२ वर्षांचे वय झाले तरीही मी माझ्या मतदानाचा हक्क बजावला आहे. देशातील सर्व मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन वणाबाई यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी भोंद्रे गावचे लोकनियुक्त सरपंच गणेश तथा अभिजीत झावरे, मुलगा बबनराव झावरे, नातू सुजित, पणतू सुयश यांच्यासह सेवा संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल शेळके, भानुदास शेळके, डॉ. अरूण झावरे, जी. एस. महानगर बँकेचे अधिकारी शांताराम झावरे, मुख्याध्यापक वाळुंज आदी उपस्थित होते.




Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
**Saint Vivekanand Public School**
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -
- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education






दुग्धज्वर हा कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे प्रामुख्याने जास्त दूध उत्पादन देणाऱ्या संकरित गाई व म्हशींमध्ये आढळून येणारा महत्त्वाचा आजार आहे. साधारणपणे व्यायल्यानंतर पहिल्या ७२ तासांपर्यंत हा जास्त प्रमाणात आढळून येतो. लक्षणे ओळखून तातडीने उपाययोजना कराव्यात.

# गाई, म्हशींना पोखरणारा दूधज्वर



दुधाळ गायी-म्हशींमध्ये आहारातील पोषणतत्त्वांच्या कमतरतेमुळे होणारे विविध उत्पादकतेशी निगडित आजार आढळून येतात. आहारात ऊर्जेच्या कमतरतेमुळे होणारा किटन बाधा (किटोसिस), कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे होणारा दुग्धज्वर (मिल्क फीवर) आणि स्फुरद कमतरतेमुळे होणारा लाल मूत्र आजार (पोस्ट-पार्च्युरियंट हिमोग्लोबिन युरिया) दिसून येतो. या आजारांमुळे बाधित जनावरांचे दुग्ध उत्पादन घटते, औषधोपचारावर मोठा खर्च होतो. आजारातून सावरलेल्या जनावरांत प्रजननाशी निगडित व्याधी जडून अजून आर्थिक नुकसान होते. गाभण काळातील शेवटचा टप्पा व व्यायल्यानंतर जास्त दूध उत्पादनाचा काळ यामध्ये दुधाळ जनावरांची निगा, आरोग्य, आहार व व्यवस्थापन योग्यप्रकारे करून उत्पादकतेशी निगडित आजार टाळता येतात व एकूणच होणारे आर्थिक नुकसान टाळता येते.

## दुग्धज्वर आजाराची कारणे

कॅल्शिअमच्या कमतरतेमुळे प्रामुख्याने जास्त दूध उत्पादन देणाऱ्या संकरित गाई व म्हशींमध्ये आढळून येणारा महत्त्वाचा आजार आहे. आजाराचा प्रादुर्भाव साधारणपणे व्यायल्यानंतर पहिल्या ७२ तासांपर्यंत जास्त प्रमाणात आढळून येतो. उच्च दूध उत्पादकता असणाऱ्या संकरित गाईमध्ये या आजाराचे प्रमाण ५ ते ७ टक्के एवढे आढळून येते. जवळपास ५० टक्के गायींमध्ये सुप्त प्रकारचा दुग्धज्वर आढळून येतो. साधारणपणे ५ ते १० वर्षे वयोगटातील तिसऱ्या ते सातव्या वितामधील गायींमध्ये हा आजार जास्त प्रमाणात आढळून येतो. विदेशी गायींच्या प्रजातीमध्ये या आजाराचा सर्वांत जास्त प्रादुर्भाव जर्सी गोवंशामध्ये आढळतो तर म्हशींमध्ये या आजारावर विशिष्ट असा अभ्यास न झाल्यामुळे म्हशींच्या विविध प्रजातीची या आजारास बळी पडण्याची माहिती उपलब्ध नाही. दुग्धज्वर हा आजार दृश्य (ज्यामध्ये आजाराची लक्षणे दिसून येतात) व सुप्त (ज्यामध्ये आजाराची लक्षणे दिसत नाहीत) प्रकार आढळून येतात. आजारी गायी-म्हशींमध्ये अवघड प्रसूती, मायांग बाहेर येणे, झार अडकणे, स्तनदाह, कितन बाधा, पोट सरकणे, प्रतिकारशक्ती कमी होणे यांसारख्या समस्या दिसतात. यामुळे आर्थिक नुकसान होते. व्यायलेल्या जनावरांत चिकामध्ये जास्त प्रमाणात कॅल्शिअम श्रवल्यामुळे रक्तातील कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते. हे प्रमाण हाडांतून रक्तामध्ये सोडण्यात येणाऱ्या कॅल्शिअमच्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याने रक्तातील कॅल्शिअम कमी होते. अशा जनावरांना दुग्धज्वर हा आजार होतो. सर्वसाधारणपणे १० किलो चीक देणाऱ्या गायीच्या शरीरातून जवळपास २३ ग्रॅम कॅल्शिअम चिकामध्ये श्रवले जाते जे एकूण रक्तात असणाऱ्या कॅल्शिअमच्या ९ पट जास्त असते. म्हणून अशावेळी रक्तातील कॅल्शिअम कमी होते. जनावरे दुग्धज्वर आजारास बळी पडतात.



## असा करा प्रतिबंध...

विण्यापूर्वी २-३ दिवस व व्यायल्यानंतर ३ दिवस दुधाळ जनावर निरीक्षणाखाली ठेवल्यास पशुपालकाला आजाराचे निदान तत्काळ करून वेळेतच पशुवैद्यकाकडून उपचार करून घेता येतील. भाकड काळातील २ ते ३ आठवड्यांत आहारातील कॅल्शिअमचे प्रमाण कमी ठेवल्यास हाडांतून कॅल्शिअम रक्तात वहनाचे कार्य सुरळीत राहते. त्यामुळे व्यायल्यानंतर चिकामध्ये कॅल्शिअम स्त्रवले तरीसुद्धा हाडातील कॅल्शिअम रक्तात निरंतर येत राहिल्याने अशी जनावरे दुग्धज्वर आजारास बळी पडत नाहीत. अमोनिअम क्लोराईड, कॅल्शिअम क्लोराईड, कॅल्शिअम सल्फेट, मॅग्नेशिअम सल्फेट इत्यादी घटक पोटातील आम्लता वाढवून हाडातील कॅल्शिअम रक्तामध्ये स्त्रवण्याचे कार्य निरंतर ठेवून जास्त उत्पादकता असलेल्या गायी- म्हशींना दुग्धज्वर आजारापासून वाचविण्यासाठी मदत करतात. साधारणपणे विण्यापूर्वी १५ ते २१ दिवस जर हे घटक आहारातून दिले तर हा आजार होत नाही. विण्यापूर्वी शेवटच्या आठवड्यात 'ड' जीवनसत्त्व १० मिलियन युनिट स्नायूमध्ये किंवा विण्यापूर्वी रोज ५ दिवस २० मिलियन युनिट 'ड' जीवनसत्त्व पाजल्यास या आजारास बळी पडण्याचे प्रमाण एकदम कमी होते. विण्यापूर्वी २४ तास व व्यायल्यानंतर ४८ तासांपर्यंत ३०० ग्रॅम कॅल्शिअम जेल दररोज पाजल्यास दुधाळ जनावरांत दुग्धज्वर आजार टाळता येतो.

## लक्षणे कोणती.. ?

**गायी-म्हशींमध्ये दुग्धज्वर आजाराची लक्षणे ही प्रामुख्याने तीन टप्प्यांत दिसून येतात.**

पहिला टप्पा : ही अवस्था थोड्या वेळासाठी दिसते. आजारी जनावरामध्ये हालचाल वाढलेली आढळून येते, डोके व पायांची हालचाल करणे, थरथर कापणे, तोंडातून लाळ गळणे अशी लक्षणे दिसून येतात. खाणे मंदावते, जनावर एका जागी उभे राहते, दात खाते व जीभ बाहेर काढते. हा टप्पा अतिशय छोटा असल्याने बऱ्याचदा पशुपालाकास माहिती होत नाही.

दुसरा टप्पा : आजाराच्या दुसऱ्या टप्प्यात जनावर पोटावर बसते व सुस्त होते, मान पोटाकडे वळवून बसून राहते, उठता येत नाही, नाकपुड्या कोरड्या पडतात, शरीर थंड पडते व शरीराचे तापमान कमी होते (९७-१०१ अंश फॅरनहाइट). ओटी पोटाची हालचाल कमी झाल्यामुळे पोट फुगते, गुदद्वार ढिले पडते, डोळे सुकतात व डोळ्यांची हालचाल मंदावते. शेवटच्या टप्प्यातील गाभण जनावरांत प्रामुख्याने म्हशीमध्ये कॅल्शिअम कमी होऊन मायांग बाहेर येते. गाभण जनावरांत विण्याच्या काळात हा आजार झाल्यास, गर्भाशयाची हालचाल मंदावल्यामुळे गाय व नवजात वासरू यांच्या सर्व बाबी योग्य असूनही नैसर्गिक प्रसूती होत नाही. अशा गायींना कॅल्शिअम सलाईन दिल्यास रक्तातील कॅल्शिअमचे योग्य प्रमाण होते व गायी नैसर्गिक प्रसूतीसाठी सक्षम बनते.

तिसरा टप्पा : दुसऱ्या टप्प्यात योग्य उपचार न झाल्यास जनावर या आजाराच्या तिसऱ्या टप्प्यात जाते. यामध्ये जनावर आडवे पडते व सर्व अंग सैल पडते, गुदद्वार बाहेर येते, जनावर बेसावध असते, शरीराचे तापमान अजून कमी होते, हृदयाचे ठोके क्षीण होऊन वाढलेले आढळतात. तिसऱ्या टप्प्यातील आजाराच्या या अवस्थेत तत्काळ उपचार न मिळाल्यास अशी जनावरे दगावू शकतात.

## निदान अन् उपचार...

आजाराचे निदान व्यायल्यानंतर पहिले ७२ तास व लक्षणे यावरून सहजपणे होते. याशिवाय आजारी जनावराचे रक्तजल नमुने प्रयोगशाळेत तपासल्यास कॅल्शिअमचे प्रमाण कमी झाल्याचे आढळून येते. निरोगी जनावरांच्या रक्तामध्ये कॅल्शिअमचे प्रमाण ८-१२ मिलिग्रॅम/ डेसीलिटर एवढे असते. दुग्धज्वर आजारात ते कमी होते. हा आजार अचानकपणे उद्‌भवणारा असून त्याचा कालावधी छोटा असतो. त्यामुळे तत्काळ उपचार करून घेणे आवश्यक असते. फक्त कॅल्शिअम किंवा कॅल्शिअम बरोबर मॅग्नेशिअम, स्फुरद व ग्लुकोज अशी दोन प्रकारची सलाईन दुग्धज्वर आजाराच्या उपचारासाठी उपलब्ध आहेत. पशुवैद्यकाकडून दुग्धज्वर ग्रासित गायी-म्हशींचा उपचार करून घेतल्यास तत्काळ रक्तातील कॅल्शिअमचे प्रमाण ८-१२ मिलिग्रॅम/ डेसीलिटर एवढे वाढते. आजाराची सर्व लक्षणे तत्काळ नाहीशी होतात. कॅल्शिअमचे सलाईन बाकीच्या इतर सलाईनसारखे जास्त वेगाने दिले तर हृदयाचे ठोके जास्त प्रमाणात वाढून जनावर उपचारादरम्यान दगावू शकते म्हणून या आजाराचा उपचार पशुवैद्यकाकडूनच करून घेण्यात यावा. उपचार झाल्यानंतर तत्काळ आडवे पडलेले किंवा बसलेले जनावर उठून उभे राहते, नाकपुडीवर पाणी सुटते, जनावर लघवी करते. लगेच चारा खाण्यास व रवंथ करण्यास सुरुवात करते. त्यानंतर दूध उत्पादन लक्षात घेऊन आहारात नियमितपणे योग्य प्रमाणात कॅल्शिअम पुरवठा केल्यास दुधाळ जनावरे या आजारास परत बळी पडत नाहीत.



# फायद्यात वाढ देणारे पनीर उत्पादन

**पनीर हा आहारामध्ये मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा दुग्धजन्य पदार्थ आहे. त्याची मागणी सातत्याने वाढत असून, दूध उत्पादक शेतकऱ्यांनी पनीर उत्पादनाचे तंत्र शिकून घेतल्यास फायद्यामध्ये वाढ होऊ शकते.**

दुधापासून पनीर, खवा, चीज, तूप अशा विविध मूल्यवर्धित प्रक्रिया उत्पादनाची निर्मिती करणे अत्यंत आवश्यक आहे. पनीर हे सामान्य दुधापेक्षा जास्त काळ टिकून राहते. शाकाहारी व्यक्तींसाठी प्रथिनांचा उत्तम स्रोत मानल्या जाणाऱ्या पनीरमध्ये आरोग्यवर्धक केसीन ही प्रथिने असतात. दुग्धजन्य पदार्थांपेक्षा पनीरमध्ये अधिक पोषण मूल्य असते. पनीर निर्मितीसाठी स्निग्धांशाचे प्रमाण अधिक असल्याने म्हशीचे दूध उत्तम असते. गरम दुधात आम्ल टाकून दूध फाटल्यानंतर त्यातील पाण्याचा अंश काढून टाकला जातो. उर्वरित घनपदार्थाला पनीर असे म्हणतात. दूध फोडण्यासाठी साधारणपणे लॅक्टिक किंवा सायट्रिक आम्लाचा वापर केला जातो. म्हशीच्या एक लिटर दुधापासून २०० ते २५० ग्रॅम, तर गाईच्या एक लिटर दुधापासून १५० ते २०० ग्रॅम पनीर मिळते. पनीर निर्मितीसाठी विविध यंत्रे बाजारात उपलब्ध आहेत. मात्र, महागड्या यंत्रांशिवायही घरगुती पद्धतीने पनीर निर्मिती करता येते.

### पनीरमधील पोषण मूल्ये (प्रति १०० ग्रॅम)

ऊर्जा - २९६ किलो कॅलरी, प्रथिने - १९.१ ग्रॅम, दुग्ध शर्करा – २.५ ग्रॅम, स्निग्धांश - २७.१ ग्रॅम, खनिजे - १.९ ग्रॅम, कॅल्शिअम - ४२० मिलीग्रॅम, सोडियम – २२.१ मिलीग्रॅम, लोह - २.१६ मिलीग्रॅम, आर्द्रता - ५२.३ ग्रॅम.

### साहित्य अन् उपकरणे...

दूध, सायट्रिक आम्ल किंवा व्हिनेगार किंवा लॅक्टिक आम्ल, मलमल कापड, स्टीलची कढई, पळी, शेगडी, पनीर दाब यंत्र व पॅकेजिंग साहित्य.



## पनीर प्रक्रिया

पनीर बनविण्यासाठी प्रथम दूध तापवून घ्यावे लागते. त्यासाठी सामान्यपणे स्टेनलेस स्टिलच्या स्वच्छ कढई, पातेले यांचा वापर करावा किंवा खवा बनवण्याचे यंत्रही यासाठी वापरता येते. स्टीलच्या भांड्यामध्ये दूध ८२ अंश सेल्सिअस तापमानाला ५ ते १० मिनिटांसाठी गरम करून घ्यावे. दूध उकळत असताना तळाशी लागू नये म्हणून ढवळत राहावे. त्यानंतर दुधाचे तापमान ३५ ते ४० अंशापर्यंत कमी होऊ द्यावे. त्यानंतर त्यात प्रति लिटर दुधामध्ये २ टक्के सायट्रिक आम्ल किंवा व्हिनेगारचे द्रावण हळूहळू ढवळत ओतावे. दूध फाटून घनपदार्थ एकत्र आल्यानंतर सायट्रिक आम्लाचे द्रावण टाकणे बंद करणे. आम्लामुळे दुधापासून छन्ना वरच्या बाजूला व दूधविरहित पाणी, निवळी खालच्या बाजूला राहते. मिश्रण ५ ते १० मिनिटे स्थिर ठेवावे. नंतर छन्ना मखमली कपड्यातून गाळून घेत पाणी काढून टाकावे. नंतर तो पदार्थ पनीर तयार करण्याच्या पात्रात २० ते ३० मिनिटांपर्यंत ठेऊन त्यावर दाब द्यावा. त्यानंतर तयार झालेले पनीर बाहेर काढून पोत चांगला होण्यासाठी त्यास २ अंश सेल्सिअस तापमान असलेल्या थंड पाण्यात तीन ते चार तासापर्यंत ठेवावे. (हे पाणी अगोदर उकळून चांगले थंड केलेले असावे). नंतर थंड झालेले पनीरला शीतकक्षात साठवून ठेवावे.

## पनीर टिकविण्यासाठी घ्यावयाची काळजी



सामान्य तापमानाला पनीर जास्तीत जास्त एक दिवस टिकू शकते. पनीर उत्तमरीत्या टिकविण्यासाठी सॉरबिक ॲसिड या परिरक्षकाचा (प्रीझर्व्हेटिव्ह) वापर करता येतो. सॉरबिक ॲसिड २० ते ३० अंश सेल्सिअस तापमान असलेल्या कोमट पाण्यात विरघळवून थेट दुधात वापरतात किंवा सॉरबिक ॲसिडच्या द्रावणातून पनीर बुडवून ठेवले जाते. त्यानंतर पनीरचे पॅकेजिंग केले जाते. कुठलेही प्रिझर्व्हेटिव्ह न टाकलेले पनीर २ अंश सेल्सिअस तापमानाला ॲल्युमिनिअम फॉईलमध्ये पॅक करावे. साधारणपणे ५ ते ७ दिवस टिकते. सॉरबिक ॲसिड (दुधाच्या ०.१ टक्के) वापरल्यामुळे व पीव्हीसी (पॉलीव्हिनायल क्लोराईड) फिल्ममध्ये घट्ट पॅक करावे. असे पनीर २ अंश सेल्सिअस तापमानास (रेफ्रिजरेशन तापमानाला) १ महिना टिकू शकते. पनीर ५ टक्के मिठाच्या द्रावणात बुडवून ठेवल्यास ४ ते ६ अंश सेल्सिअस तापमानाला साधारणपणे १५ ते २० दिवस टिकते. पनीरचे तुकडे करून ते टीन कॅनमध्ये पॅक करावेत. हे हवाबंद टिन कॅन १५ मिनिटांसाठी ऑटोक्लेव्ह केल्यास (प्रेशर कुकरसारखे), तर २५ ते ३० अंश सेल्सिअस तापमानास हे पनीर ५० ते ६० दिवसांपर्यंत टिकते. फक्त या प्रक्रियेमध्ये पनीरला थोडा तपकिरी रंग येतो. श्रिंक फिल्ममध्ये पॅक केलेले पनीर २ अंश सेल्सिअस (रेफ्रिजरेटर तापमानाला) १० ते १५ दिवसांपर्यंत टिकते. पनीर इव्हीए (इथिलीन-विनाइल एसीटेट), पीव्हीडीसी (पॉलीव्हिनाल्डिन क्लोराईड), एमएपी (सुधारित वातावरण पॅकेजिंग) अशा प्रकारच्या विशिष्ट फिल्ममध्ये पॅक करावे. ते पनीर २ अंश सेल्सिअस (रेफ्रिजरेशन तापमानाला) ८० ते ९० दिवसांपर्यंत टिकवता येते.

# दूध उत्पादन वाढ; खर्चातही बचत ॲझोला!



**ॲझोलामध्ये प्रथिने, खनिजे (जीवनसत्त्व अ, जीवनसत्त्व ब) अमिनो आम्ल यासारखी घटक द्रव्ये इतर चाऱ्यांचा पिकांपेक्षा जास्त असल्याने याचा वापर जनावरांच्या आहारात केला असता दूध उत्पादनाबरोबरच दुधातील स्निग्ध घटक वाढतो. खाद्याच्या खर्चात बचत होते.**

जनावरांच्या आहारात संकरित नेपिअर, सुबाभूळ, चवळी, लसूणघास यांचा वापर करावा. त्याचबरोबरीने ॲझोलाचाही चांगल्या प्रकारे वापर होऊ शकतो. जैविक खत म्हणून वापरात असणाऱ्या ॲझोलामध्ये प्रथिने, खनिजे (जीवनसत्त्व अ, जीवनसत्त्व ब) अमिनो आम्ल यासारखी घटक द्रव्ये इतर चाऱ्यांचा पिकांपेक्षा जास्त असल्याने याचा वापर जनावरांच्या आहारात केला असता दूध उत्पादनाबरोबरच दुधातील स्निग्ध घटक वाढतो. खाद्याच्या खर्चात बचत होते.

## ॲझोला तयार करण्याची पद्धत

ॲझोला वाढीसाठी सूर्यप्रकाशाची जरुरी असते. यामध्ये नत्राचे स्थिरीकरण करण्याची क्षमता असल्यामुळे त्याच्या वाढीसाठी नत्राची आवश्यकता लागत नाही. मात्र थोड्या प्रमाणात स्फुरद आवश्यक असते. पूरक वातावरणात ॲझोलाची वाढ साधारणतः आठ दिवसात दुप्पट होते. ॲझोला तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी जागा सपाट आणि तणरहीत करून घ्यावी. १० सें.मी. उंचीच्या विटा वापरून २.२५ X १.५ मीटर आकाराचा आयताकृती वाफा तयार करावा. वाफ्याच्या तळाशी प्लॅस्टिक पेपर पसरावा.यानंतर २.५ मीटर X १.८ मीटर आकाराचा १५० जी. एस.एम. जाडीचा प्लॅस्टिक कागद वाफ्याचे काठ झाकले जातील या पद्धतीने अंथरावा. अशारितीने १० सें.मी. खोलीचा वाफा तयार होईल. या वाफ्यामध्ये ३० ते ३५ किलो चाळलेली माती सारख्या प्रमाणात पसरावी. १० किलो चांगले कुजलेले शेणखत,१०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट २० लिटर पाण्यात मिसळावे. तयार झालेले द्रावण वाफ्यामध्ये सावकाश ओतावे. वाफ्यामध्ये ७ ते १० सें.मी. उंची राहील एवढे पाणी सावकाश ओतावे. त्यानंतर १ ते १.५ किलो ॲझोला सारख्या प्रमाणात वाफ्यामध्ये सावकाश सोडावे. दहा दिवसांनंतर १ ते १.५ किलो ॲझोलापासून ८ ते १० किलो ॲझोलाची वाढ झालेली दिसून येईल. अशा वाफ्यातून रोज १ ते १.५ किलो ॲझोलाचे उत्पादन मिळते.

### खाद्यामधील वापर

जनावरांच्या खाद्यामध्ये ॲझोलाचा वापर खुराकाच्या १:१ प्रमाणात करावा. सुरुवातीला थोडेसे ॲझोला खाद्यात मिसळून हळूहळू प्रमाण वाढवत न्यावे. जनावरांना २ किलो खुराक देत असाल तर १ किलो खुराक आणि १ किलो ॲझोला एकत्र मिसळून द्यावे. जर जास्त प्रमाणात उत्पादन असेल तर त्याचा वाळवून सुद्धा खाद्यात उपयोग करता येतो.

### फायदे कोणते ?

- उत्पादन खर्च जास्तीत जास्त प्रति किलो १ रुपया पर्यंत येतो. दुग्धोत्पादन १५ टक्यांपर्यंत वाढते.
- खुराकाचे प्रमाण २० टक्यांपर्यंत कमी होऊ शकते. खाद्यावरील खर्च कमी होतो.
- दुधातील प्रथिनांचे तसेच स्निग्धांशाचे प्रमाण वाढते.
- जनावरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. कोंबड्यांना खाद्य म्हणून दिल्यास अंडी देण्याच्या प्रमाणात वाढ तसेच अंड्याच्या पृष्ठभाग चकचकीत होतो.

## शॉर्ट न्यूज

### शिरेगाव व अंमळनेर बंधारे भरून देण्याची मागणी

■ **नेवासा :** तालुक्यातील मुळा काठ परिसरातील करजगाव,पानेगाव, अमळनेर, निंभारी, शिरेगाव, खेडले परमानंद परिसरातील मुळा नदीचे पात्र कोरडेठाक पडले आहे. यामुळे मुळानदी पात्रातील शिरेगाव व अंमळनेर येथील बंधारे भरून देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मागिल वर्षी चांगला पाऊस न झाल्यामुळे विहिरी बोरवेलच्या पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याच्या मार्गावर आहे. दुष्काळजन्य परिस्थिती झाल्यामुळे जनावऱ्यांच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न बिकट होण्याची शक्यता असून बंधारे भरल्यास फायदा होईल.

### पत्नीला ठार मारल्याप्रकरणी जन्मठेप

■ **श्रीगोंदा :** कुऱ्हाडीने वार करून पत्नीस जिवे मारल्याप्रकरणी पिंपळगाव पिसा (ता. श्रीगोंदा) येथील रोहिदास भिकाजी पंधरकर याला श्रीगोंदा येथील जिल्हा सत्र न्यायाधीश मुजीब शेख यांनी जन्मपेठेची शिक्षा सुनावली आहे. याबाबत बेलवंडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक नंदकुमार दुधाळ यांनी जिल्हा सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी न्यायाधीश मुजीब एस. शेख यांच्या समोर झाली. या खटल्यामध्ये सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील पुष्पा कापसे/गायके यांनी काम पाहिले.

### अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने खळबळ

■ **संगमनेर :** तालुक्यातील तळेगाव दिघे येथील विद्युत सबस्टेशन परिसरातअंदाजे ४५ वर्षीय अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. रविवारी ११ वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. श्रीरंग रेवजी दिघे यांच्या मालकीच्या शेतात अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला. सदर इसमाने केवळ अंडरवेअर परिधान केलेली होती. याबाबत पोलीस पाटील दत्तू इल्हे यांनी संगमनेर तालुका पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस हेड कॉ. राजेंद्र पालवे यांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा केला.

### योगा केंद्रात अनुभवली सुदर्शन क्रिया

■ **सावेडी :** आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते प. पू. श्री श्री रविशंकरची यांचे ६८ व्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर शहरात सावेडी येथील योगा धान केंद्र येथे भव्य हॅपीनेस प्रोग्राम शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरासाठी बंगलोर आश्रम येथील आंतराराष्ट्रीय प्रशिक्षक श्री सलीलजी पुळेकर यांचे सहा दिवशीय शिबीरात उपस्थितीतांना अनमोल मार्गदर्शन मिळाले. यामध्ये नगरचे प्रशिक्षक चंद्रकांत तागड, नरेंद्र बोठे, बीना हेगडे, संगिता पाचे, सुपर्णा देशमुख, पूनम थोरात इ. अनेक प्रशिक्षकांनी यामध्ये सेवा योगदान दिले.

### महात्मा बसवेश्वरांच्या वचन स्तंभाचा लोकार्पण

■ **कोपरगाव :** महात्मा बसवेश्वर यांनी त्यांचे विचार, त्यांनी लिहिलेली वचने यांची आज ही समाजाला गरज आहे. त्यांचे विचार, वचने ही सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक प्रगतीचा मूलमंत्र असून समाजातील प्रत्येक व्यक्तीने ती स्वीकारली पाहिजे. असे प्रतिपादन नाशिक जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ पत्रकार प्रकाश साबरे यांनी कोपरगाव शहरातील निवारा परिसरात महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कशिदा निवासस्थानाजवळ महात्मा बसवेश्वर यांच्या वचन स्तंभाचे लोकार्पण प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

# सोनसाखळी स्नॅचिंग करणाऱ्या तीन आरोपींना अटक

## एलसीबीची कारवाई ; सापळा रचून आरोपी ताब्यात



**नगर : प्रतिनिधी**

**शहरातील सावेडी उपनगरात असलेल्या नवलेनगर चौकात महिलेला धक्काबुक्की करून तिच्या गळ्यातील सोनसाखळी स्नॅचिंग करणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज जेरबंद केले. त्यांच्याकडून एक लाख ८९ हजार रुपये किमतीचे दागिने हस्तगत करण्यात आले. बिरजा राजू जाधव (वय २३, रा. मकासरे चाळ, कायनेटिक चौक, नगर), कृष्णा मुकेश रनशूर (वय १९, रा. समाज मंदिराजवळ, वाकोडी, ता. नगर) व कुंदन लक्ष्मण कांबळे (वय २५, रा. समाज मंदिराजवळ, वाकोडी, ता. नगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

कांता पुरी या गुरुवारी नवलेनगर चौकातून चालल्या होत्या. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी कांता पुरी यांना धक्काबुक्की करत त्यांच्या गळ्यातील ७ ग्रॅम वजनाची सोनसाखळी हिसकावून नेली. या संदर्भात कांता पुरी यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यावरून पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भेट दिली. तेथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. यात एका संशयित आरोपीची ओळख पथकाला पटली. संशयित आरोपी हा त्याच्या साथीदारांसह वाकोडी फाटा ते वाकोडी रस्त्यावर येणार असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. जेरबंद आरोपींपैकी बिरजा जाधव हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर यापूर्वी ११ गुन्हे दाखल आहेत. तर कुंदन कांबळेवर एक गुन्हा दाखल आहे. पथकाने जेरबंद आरोपींना पुढील तपासासाठी तोफखाना पोलिसांच्या ताब्यात दिले.

# संभाजीनगरमध्ये गर्भलिंग निदान करणारे रॅकेट उध्वस्त

## ■ १९ वर्षीय इंजिनिअरींग तरुणी होती मास्टरमाईंड
## ■ उच्चभ्रू वस्तीत कारवाई, १२ लाख जप्त

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून गर्भलिंग निदान करणारे रॅकेट उध्वस्त करण्यात आले आहे. इंजिनिअरींग करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणीच्या राहत्या घरी ही कारवाई करण्यात आली आहे. यावेळी घरातून सोनोग्राफी जेल, प्रोब, लॅपटॉप इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच १२ लाख ७८ हजारांची रोख रक्कम देखील सापडली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरमधील तिरुपती नगर परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. शहरातील एका उच्चभ्रू वसाहतीत गर्भलिंग निदान केले जात असल्याची माहिती आरोग्य अधिकारी पारस मंडलेचा यांना मिळाली होती. त्यानुसार महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर छापा टाकला. यावेळी एका खोलीत गर्भलिंग निदान करण्यात येत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

इंजिनिअरिंग करणाऱ्या एका तरुणीकडून हे गर्भलिंग निदान केंद्र चालवले जात असल्याचे अधिकाऱ्यांच्या चौकशीतून समोर आले आहे. यावेळी आरोग्य पथकाला



घटनास्थळी १२ लाख ७८ हजारांची रोख रक्कमही सापडली. तसेच खोलीत सोनोग्राफीसाठी लागणारे साहित्य, लॅपटॉप, टॅब देखील जप्त करण्यात आले. दरम्यान, एका उच्चभ्रू वस्तीत हा प्रकार उघडकीस आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. गेल्याच आठवड्यात राज्यातील २२ जिल्ह्यांत मुलांच्या तुलनेत मुलींच्या संख्येत घट झाली होती. बंदी असूनही राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्भलिंग निदान आणि मुलींचे गर्भपात होत असल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी एका पत्रात याबाबत माहिती नमूद केली आहे. त्यामुळे या २२ जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तरचे प्रमाण म्हणजे एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण चिंतादायकरीत्या घटल्याचे समोर आले आहे.

# पद्मश्री पोपटराव पवार रांगेत उभे !

**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**राज्याच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार येथे मतदानाचा हक्क बजावला. सर्वसामान्य मतदारांबरोबरच त्यांनी रांगेत जाऊन मतदान केले. या गावात कोणत्याही पक्ष पार्टीचे बुथ न लावता गावकरीच निवडणूक प्रक्रिया हातात घेऊन मतदारांना आणण्या नेण्याची व्यवस्था देखील गावकऱ्यांमार्फतच केली जाते.**

यावर्षी देखील पद्मश्री पवार यांनी सर्व राजकीय पक्षांना तसे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत कोणत्याही राजकीय पक्षांनी या ठिकाणी मतदान प्रतिनिधीची देखील नेमणूक केली नाही आज हिवरे बाजार ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे मतदानाचा हक्क बजावला. मतदान केंद्रावर शालेय विद्यार्थ्यांनी घोषणा देत तसेच हातात फलक धरत मतदान करण्याचे आवाहन केले होते. हिवरेबाजार येथे शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली.



(पान १ वरून)

## अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा

अंदाज वर्तविण्यात येत आहे. सायंकाळी विविध मतदान केंद्रांवर मतदारांनी मतदानासाठी रांगा लावल्या होत्या. पारनेर शहरात काही बुथवर सायंकाळी सहा नंतरही मतदान सुरू होते. मतदान संपल्यानंतर तालुक्यातील कान्हूरपठार येथे ६४ टक्के, निघोज ७३ टक्के, अक्कलवाडी ६१ टक्के, गोरेगांव ६५ टक्के, वासुंदे ६५ टक्के, वाघुंडे बुद्रुक येथे ७७ टक्के, काळेवाडीत ६८.७६ टक्के, तिखोल ८ टक्के, कळस ६२ टक्के, गारखींडी ६६.४४ टक्के, रांधे ६४.८३ टक्के, पळवे बु. ७८ टक्के, चोंभूत ७३ टक्के, पानोली ७० टक्के इतके मतदान झाले होते. पारनेर शहर बुथ क्र. १८२ मध्ये ६४ टक्के, बूथ क्र १८३ ६२ टक्के, तर बुथ क्र. १८७मध्ये ६६.७१ टक्के, सोबलेवाडी, कुंभारवाडी ७० टक्के मतदान झाले होते.

# गळ्यात कांद्याची माळ आणि रस्त्यावर दूध !

## मतदानापूर्वी शेतकऱ्याकडून मोदी सरकारचा निषेध

**कर्जत : प्रतिनिधी**

**कांद्यावरील निर्यातबंदी उठवूनही कांद्याचे दर कोसल्याने तसेच दूधाचे दरही कमी झाल्याने शेतकरी संकटात सापडला असून त्याचा निषेध करण्यासाठी बहिरोबावाडी येथील शेतकऱ्याने गळयात कांद्याची माळ घालून रस्त्यावर दुध ओतत मतदानापूर्वी शासनाचा निषेध केला.**



शेतकरी रामदास लाळगे हे त्यांच्या मळयातून वाडीमध्ये येतानाच गळयात कांद्याची माळ घालून व कॅनमध्ये दूध घेऊन आले होते. वाडीत आल्यानंतर त्यांनी सर्वांचेच लक्ष वेधले. मी मोदी सरकारचा निषेध करतो आहे. शेतमालास भाव नाही. दुधाला पाण्यापेक्षाही कमी भाव मिळतो असल्याचे लाळगे यांनी यावेळी सांगितले.









# जाधवांवरील हल्ला शहरातील दहशतीचे मुर्तीमंत उदाहरण

## नीलेश लंके यांचा सुजय विखेंवर निशाणा

**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरात आपण अनेक दिवसांपासून जे चित्र पाहतो आहोत त्या दहशतीचे नगरसेवक सचिन जाधव यांच्यावर झालेला हल्ला हे मुर्तीतंत उदाहरण आहे असल्याचे सांगत महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी भाजपा उमेदवार खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर हल्ला चढविला.**

शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख सचिन जाधव यांच्यावर रविवारी दुपारी प्राणघातक हल्ला करण्यात आला. ज्यांच्यावर हल्ला झाला आणि हल्ला करणारे दोन्ही गट भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांचे समर्थक आहेत.

सचिन जाधव यांच्यावर हल्ला करण्याबरोबरच त्यांच्या संपर्क कार्यालयाचीही मोठया प्रमाणावर तोडफोड करण्यात आली. जाधव यांच्या कार्यालयाबाहेर असलेल्या वाहनांचीही मोठया प्रमाणावर तोडफोड करण्यात आली असून या घटनेच्या पार्श्वभुमीवर जाधव यांच्या कार्यायाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, नगरसेवक सचिन जाधव यांच्यावर हल्ला



झाल्यानंतर त्यांना नगरच्या खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्या डोके तसेच नाकास मार लागल्याची माहीती वैद्यकिय सुत्रांकडून देण्यात आली.

दरम्यान, या घटनेची माहीती मिळाल्यानंतर महविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जाधव यांच्यावर ज्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत तिथे जात त्यांच्या प्रकृतीची त्यांनी चौकशी करत त्यांना धिरही दिला.

जाधव यांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना लंके म्हणाले, नगर शहरवासीयांकडून मला विकासाच्या मागणीचे अपेक्षा होती, मात्र लोकसभा निवडणूकीच्या प्रचाराच्या निमित्ताने नगर शहरवासीय माझ्याकडे संरक्षणाची मागणी करत होते. अनिल भैय्यांनी भयमुक्त नगरचा नारा दिला होता. त्यांच्या पश्चात आजही एका नगरसेवकावर हल्ला झाला आहे हे दुर्देव असून नगर शहरास भयमुक्त करणे अत्यावष्यक असल्याचे लंके म्हणाले.

लंके पुढे म्हणाले, निवडणूक प्रचाराच्या कालखंडामध्ये आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. काही लोकांना रूग्णालयात दाखल करून आमच्या कार्यकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला, मात्र सत्य हे झाकत नाही. संबंधित व्यक्तींनी त्या घटनांशी नीलेश लंके यांचा काहीही सबंध नसल्याचा खुलासा केला आहे. आज मात्र सत्याची बाजू समोर आली आहे. खरी गुंडा गर्दी कोणाची आहे हे आज जनतेसमोर आले असल्याचे लंके म्हणाले.

लंके पुढे म्हणाले, एक नगरसेवक त्याच्या प्रभागातील १० ते २० हजार लोकांचे प्रतिनिधीत्व करतो. त्या नगरसेवकास त्याच्या कार्यालयात जाऊन मारहाण होते हे पाहता नगर शहरात किती दहशतीचे वातावरण आहे याची प्रचिती येते. मी प्रशासनाकडे मागणी करतो की ही घटना कशामुळे घडली ? त्याचा शोध घेउन दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे. या घटनेला पाठीशी न घालता ज्या नगरसेवकास मारहाण झाली आहे त्यांना न्याय मिळाला पाहिजे. दोघांमधील वाद वैयक्तीक वाद असो किंवा काहीही असो इतक्या टोकाला जाणे साफ चुकीचे आहे. एखाद्या व्यक्तीच्या जीवाशी खेळ केला जात असेल तर हा दहशतवाद थांबला पाहिजे अशी मागणी आ. नीलेश लंके यांनी यावेळी बोलताना केली.

# पुजारी यांनी स्टेट बँकेचे कामकाज लोकाभिमुख केले

## नगरसेवक अशोक चेडे यांचे प्रतिपादन

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शाखेच्या व्यवस्थापिका अरूंधती पुजारी यांनी स्टेट बँकेचे कामकाज लोकाभिमुख केले असे गौरवोद्गार नगरसेवक अशोक चेडे यांनी काढले.**

श्रीमती पुजारी यांचा येथील तीन वर्षांचा कार्यकाळ संपल्यामुळे त्यांची केडगाव येथे बदली झाली आहे.त्यांना निरोप देताना चेडे बोलत होते. पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, उद्योजक शिवाजी चेडे (सर) , अनिल गंधाडे यावेळी उपस्थित होते.

नगरसेवक चेडे म्हणाले की, शिस्तप्रिय स्वभावाच्या पुजारी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्टेट बँकेच्या पारनेर शाखेच्या



**■ स्टेट बँकेच्या पारनेर शाखेच्या व्यवस्थापिका अरूंधती पुजारी यांची बदली झाल्याने त्यांना निरोप देण्यात आला.**

प्रत्येक ग्राहकाला तत्पर सेवा देण्याचा प्रयत्न केला. विविध शासकीय योजनांची खाती,निवृत्ती वेतन धारकांची खाती मोठ्या प्रमाणावर स्टेट बँकेत आहेत. मोठ्या संख्येने असलेल्या या खातेदारांबरोबरच बँकेत नियमित व्यवहार करणाऱ्या व्यावसायिकांची, सर्वसामान्यांच्या खात्यांची संख्या मोठी आहे. त्याचबरोबर इतर बँकविषयक कामांसाठी बँकेत येणाऱ्या ग्राहकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे बँकेत नेहमीच गर्दी असते. मात्र श्रीमती पुजारी यांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना तत्पर सेवा दिल्यामुळे बँकेचे कामकाज लोकाभिमुख झाले असल्याचे चेडे म्हणाले.यावेळी उपस्थित असलेल्या संजय वाघमारे, शिवाजी चेडे यांनी श्रीमती पुजारी यांना शुभेच्छा दिल्या.

# बेलकर बंधू लंके यांच्यासोबतच !

## ■ विरोधकांची खोडसाळपणातून बातमी प्रसिध्द केल्याचा खुलासा ■ विखे हतबल झाल्याची टीका



**पारनेर : प्रतिनिधी**

**सोमवारी होणाऱ्या लोकसभा निवडणूकीमध्ये काळेवाडीचे गंगाराम बेलकर व शिवाजी बेलकर हे आ. नीलेश लंके यांच्यासोबतच असून विरोधकांनी आमच्या खदखदीचा फायदा घेत हे वृत्त प्रसारीत करून विपर्यास केल्याचा खुलासा गंगाराम बेलकर व शिवाजी बेलकर यांनी केला आहे. दरम्यान, पराभव दिसू लागल्याने हतबल मानसिकतेतून विखे यांच्याकडून असे प्रकार सुरू झाल्याचे महाविकास आघाडीच्या वतीने सांगण्यात आले.**

शिवाजी बेलकर म्हणाले, सोशल मीडियावर जे वृत्त प्रसारीत झाले आहे ते खोडसाळपाणातून देण्यात आले आहे. गंगाराम बेलकर यांची थोडीफार नाराजी होती, परंतू त्याबाबत आ. नीलेश लंके यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांची नाराजी दुर झाली आहे. संपूर्ण टाकळी ढोकेश्वर गटामध्ये लंके यांच्या मताधिक्क्यासाठी आम्ही दोघे बंधू परीश्रम घेत आहोत. लंके यांचा विजय निश्चित आहे. त्यांच्या मताधिक्क्यात वाढ करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला असल्याचे असे शिवाजी बेलकर म्हणाले.

गंगाराम बेलकर म्हणाले, तरूण मंडळ तसेच ज्येष्ठ मंडळी यांनी एकत्र बसून नीलेश लंके यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या दोन महिन्यात काही गोष्टी जाणवल्याने थोडी नाराजी होती ती लंके यांच्याशी चर्चा केल्यानंतर दुर झाली आहे. बाजार समितीच्या पदाधिकारी निवडीचा विषय होता, त्यातून खदखद होती. मात्र चर्चेनंतर ती दुर झाली आहे. एक पाय इकडे व दुसरा तिकडे असे राजकारण आम्ही करत नाही आम्ही नीलेश लंके यांच्यासोबत होतो व यापुढेही राहणार आहोत. आमच्या मनातील खदखद ओळखून तशा प्रकारचे वृत्त खोडसाळपणातून देण्यात आले आहे. मात्र तरूण मंडळे तसेच ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला घेतल्याशिवाय आम्ही कोणताही निर्णय घेऊ शकत नाही. आमच्या खदखदीचा विपर्यास करणे अत्यंत चुकीचे होते. आमदार नीलेश लंके यांचा यात दोष नसल्याचे गंगाराम बेलकर म्हणाले. विपर्यास असलेले वृत्त आल्यानंतर प्रकाश गाजरे व शिवाजी भोसले यांनी पुढाकार घेत या प्रकरणावर पडदा पाडण्यात महत्वाची भूमिका बजावली.

# निवडणूक निरीक्षक आरोरा यांच्या पारनेर तालुक्यात भेटी

## विविध मतदान केंद्रांचा घेतला आढावा

**पारनेर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणूकीसाठी सोमवारी होत असलेल्या मतदानाचा केंद्रीय मुख्य निवडणूक निरीक्षक रवीकुमार आरोरा यांनी पारनेर तालुक्यातील विविध मतदान केंद्रांना भेटी देत मतदान प्रक्रियेचा आढावा घेतला.**

पारनेर येथे उपविभागीय अधिकारी गणेश राठोड यांनी त्यांचे स्वागत केले. तहसिलदार गायत्री सैंदाणे, नायब तहसिलदार श्रीमती कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. दरम्यान मतदानप्रक्रीयेदरम्यान अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे यांनीही विविध मतदान केंद्रांना भेटी देत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला.

तालुक्यातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत असून अनेक मतदान केंद्रांवर मतदानासाठी रांगा लागल्याचे चित्र होते. सर्व ठिकाणी शांततेत मतदान झाले असून कोणताही अनुचित प्रकार घडला नाही अथवा मतदान केंद्रात तांत्रीक बिघाडही झाला नसल्याचे प्रांताधिकारी गणेश राठोड यांनी सांगितले.



**■ केंद्रीय मुख्य निवडणूक निरीक्षक रवीकुमार आरोरा यांनी पारनेर तालुक्यातील केंद्रांना दिलेल्या भेटीप्रसंगी प्रांताधिकारी गणेश राठोड यांनी त्यांचे स्वागत केले.**

# वाहन चालकाचे अपहरण करणारे दोघे गजाआड

## सीसीटीव्ही मार्फत आरोपींचा शोध

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा एमआयडीसीतूनवाहन चालकाचे अपहरण करून खंडणी उकळणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज जेरबंद केले. शरद बापू पवार (वय २७) व संदीप लक्ष्मण थिटे (वय ३७, रा. सय्यदमीर लोणी, ता. आष्टी, जि. बीड) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**

विष्णू आघावहे वाहन चालक शिक्रापूर येथून सुपा एमआयडीसीला गुरुवारी (ता. ९) आले होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी आमच्या कंटेनरचा आरसा तोडला, त्याची भरपाई दे, असे म्हणत विष्णू आघाव यांना त्यांनी दुचाकीवर बसविले. आघाव यांनामिरजगाव रस्तावर नेले. तेथे त्यांच्या जवळील २१ हजार रुपये रोख, पाच हजार रुपयांचा मोबाईल व ऑनलाईन ४२ हजार ४०० रुपये काढून घेतले.

या संदर्भात सुपा पोलीस ठाण्यात अपहरण व जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा तपास लावला. आरोपींना नगर शहरातील वाडिया पार्क परिसरातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन मोबाईल व एक दुचाकी, असा एक लाख ३१ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

# सुपा परिसरात उत्स्फूर्तपणे मतदान

## सकाळच्या सत्रात लावल्या मतदारांनी रांगा




**सुपा : प्रतिनिधी**

**अहमदनगर दक्षिण लोकसभा निवडणुकीत सोमवार दि.१३ रोजी मतदान घेण्यात आले. मतदारांनी सकाळच्या सत्रात लांबच्या लांब रांगा लावत आपला मतदानाचा हक्क बजावला.**

नगर लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून डॉ. सुजय विखे पाटील तर शरदचंद्रजी पवार यांच्या गटातून माजी आमदार नीलेश लंके यांच्यात अत्यंत चुरशीची लढत होत आहे. नगर दक्षिण लोकसभा ही निवडणूक राज्यात लक्षवेधी ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या तर राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्रजी पवार गटाकडून माजी आमदार नीलेश लंके यांच्या प्रचारासाठी शरद पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, डॉ. अमोल कोल्हे, खा. सुप्रियाताई सुळे, आमदार रोहित पवार यांनी प्रचारसभा घेऊन वातावरण निर्मिती केली.

दरम्यान सुपा परिसरात सकाळी ७ वाजता मतदान केंद्र चालू झाल्यानंतर मतदारांनी मतदानाचा हक्क बजावण्यास प्रारंभ केला. यादरम्यान चालू वर्षी उन्हाळा कडक असल्याने मतदान केंद्रासमोर मंडपची व्यवस्था करण्यात आली होती. सुपा शहरासह, हंगा, मुंगशी, जातेगाव, घाणेगाव, गटेवाडी, पळवे, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण, पाडळी रांजणगाव, कडूस, भोयरे गांगर्डा, बाबुर्डी, आपधूप, रूईछत्रपती, वाळवणे, पिंपरी गवळी, रांजणगाव मशीद, रायतळे, अस्तगाव आदी ठिकाणी मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करत आपला हक्क बजावला. दुपारपर्यंत किरकोळ वादा वादी वगळता मतदान प्रक्रिया सुरळीत चालू होती. यादरम्यान पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## मधुकर शिंदे यांचे निधन

**सुपा : प्रतिनिधी**

**शहाजापुर ता. पारनेर येथील रहिवाशी मधुकर भिवसेन शिंदे (वय ६१) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, दोन मुली, भाऊ, भावजय, सुन, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार सुरेंद्र शिंदे याचे ते चुलत बंधु होते.**



कै.मधुकर शिंदे यांचा मुंबईकर मित्र मंडळ व संत निळोबाराय दिंडी सोहळ्यात सक्रिय सहभाग असत. त्याच्या अचानक जाण्याने शहाजापुर गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर शहाजापुर येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नव्या युगातील तरूणाईलाही गेट टुगेदरची भुरळ!

## पारनेर पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**पारनेर : प्रतिनिधी**

**सोशल मीडीयापूर्व काळातील साधारणतः सन १९८० ते २००० या वीस वर्षांच्या कालावधीमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या गेट टूगेदरची क्रेझ गेल्या सहा सात वर्षांपासून आल्याचे दिसते. तीच क्रेझ आता माहीती तंत्रज्ञानाच्या युगात वावरणाऱ्या तरूणाईमध्येही पहावयास मिळाली. पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुलच्या सन २०१९-२० च्या दहावीच्या इंग्रजी माध्यमाच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये पहावयास मिळाली.**

या बॅचच्या सुपे येथील सुजित पवार याने वर्गातील माजी विद्यार्थी, विद्यार्थीनींचा व्हॉटसअॅप ग्रुप तयार करून सर्वांना एकत्र केले. सर्वांच्या विचारमंथनातून गेट टुगेदरचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आले. दि. १२ मे रोजी हे गेट टुगेदर पारनेर येथे पार पडले. माध्यमिक शिक्षणानंतर गेल्या चार वर्षात प्रत्येकाने पुढील शिक्षणासाठी निवडलेले क्षेत्र, पारनेर पब्लिक स्कुल व इतर शिक्षण संस्थेमधील तुलना करतानाच चार वर्षातील कडू गोड आठवणींना सर्वांनी उजाळा दिला.

पारनेर पब्लिक स्कुलचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांची शिस्त, प्रत्येकाने अभ्यासात आपले शंभर टक्के योगदान द्यावे यासाठी त्यांचा असलेला आग्रह व माझ्या प्रत्येक विद्यार्थ्याने त्याच्या आवडत्या क्षेत्रात भरारी घ्यावी या त्यांच्या शुभेच्छांचा सर्वांनी आवर्जुन उल्लेख केला.




**■ सन २०१९-२० च्या पारनेर पब्लिक स्कुलच्या दहावीच्या बॅचचे गेट टुगेदर उत्साहात पार पडले.**

### तुझं मतदान कोणाला ?

**यंदाच्या लोकसभा निवडणूकीत प्रथमच मतदान करणाऱ्या या विद्यार्थी-विद्यार्थीनींमध्ये कोण कोणत्या उमेदवाराला मतदान करणार याचे कुतूहल असल्याचेही पहावयास मिळाले. कोणी नीलेश लंके यांना तर कोणी सुजय विखे यांना पसंती देत होते. एकमेकांना याच उमेदवारास मतदान करण्याचा आग्रही करण्यात येत होता.**

दि. १३ मे रोजी होत असलेल्या लोकसभेच्या निवडणूकीमध्ये या बॅचचे सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रथमच मतदान करणार आहेत. मतदान प्रक्रियेविषयी देखील या स्नेहमेळाव्यात चांगलीच चर्चा झाली. प्रत्येकाला पहिल्या मतदानाबाबत कुतूहल असल्याचे चर्चेतून जाणवले. स्नेहभोजनानंतर या स्नेहमेळाव्याची उत्साहात सांगता झाली.

या मेळाव्यास गौरी वाघमारे, पायल पवार, स्नेहल खरमाळे, शिवाजी पठारे, सेजल पवार, सुजित पवार, अभिषेक गोसावी, ऋषीकेश पवार, कुणाल पठारे, नसरूद्दीन खान, नितिन पवार, वैभव थोरात, सिध्देश मापारी, सिध्दार्थ कळमकर हे उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com